“स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव” अंतर्गत “चला जाणुया नदीला” या अभियानासाठी समिती गठीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,
शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२२२/ प्र. क्र. २७६/सां.का.४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ३० सप्टेंबर, २०२२

वाचा :- शासन निर्णय, जलसंपदा विभाग क्र. संकीर्ण २०१६/(प्र.क्र.०७/१६) लक्षेवि (आस्था), दिनांक ११ फेब्रुवारी, २०१६

**प्रस्तावना :-**

भारतीय संस्कृतीनुसार सजीवसृष्टीकरीता पंचमहाभुतांचे अस्तित्व अत्यंत महत्वाचे आहे. त्यामुळेच आपल्या संस्कृतीत या पंचमहाभुतांची पुजा करुन त्यांचे आपल्या जीवनातील स्थान अधोरेखित करण्यात आले आहे. “जल” हे या पंचमहाभुतापैकीच एक तत्व आहे. सजीवांच्या अस्तित्वासाठी पुरेशा स्वच्छ पाण्याची उपलब्धता न झाल्यास त्याचे अस्तित्व धोक्यात येऊ शकते. गेल्या काही काळात नैसर्गिक बदलामुळे पावसाचे प्रमाण व वेळा अनिश्चित झाल्याने पाण्याचे नियोजन करणे अडचणीचे झाले आहे. राज्यात गेल्या काही वर्षात निर्माण होणाऱ्या सततच्या अवर्षण परिस्थितीमुळे पाणी टंचाईचे संकट वाढत आहे. पाण्याची उपलब्धता व पाणी वापराचे नियोजन, पाण्याचा अपव्यय टाळणे, पाण्याचा गरजेपुरता वापर करणे, नैसर्गिक जलस्त्रोत, नदया व जलाशयाचे प्रदुषण रोखणे, पायाभूत सुविधांचे संरक्षण करणे, पाण्यासंबंधी कायदे व नियमांचे पालन करणे याबाबत समाजात जागृती व साक्षरता निर्माण होण्याची गरज लक्षात घेता, विशेष प्रयत्नांची आवश्यकता आहे. तसेच नद्या व जलाशयाच्या माध्यमातून होणाऱ्या जल व हरित उत्पन्नाबाबत निदर्शनास आलेल्या या सर्व बाबी लक्षात घेऊन, तसेच नदीबाबत जनसामान्यांशी संवाद, समन्वय, नदीबाबतची माहिती जाणून घेण्यासाठी “स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव” अंतर्गत “चला जाणुया नदीला” या अभियानाचे नियोजन प्रस्तावित आहे. सदर अभियानांतर्गत समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

“स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव” अंतर्गत “चला जाणुया नदीला” या अभियानांतर्गत नियोजन व अंमलबजावणी करण्यासाठी मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| शासकीय सदस्य | | |
| १. | मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य | अध्यक्ष |
| २. | मा. अपर मुख्य सचिव, महसूल | सदस्य |





Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| ३. | मा. अपर मुख्य सचिव, ग्राम विकास | सदस्य |
| ४. | प्रधान सचिव (वने) | कार्याध्यक्ष |
| ५. | प्रधान सचिव, जलसंपदा | सदस्य |
| ६. | प्रधान सचिव, जलसंधारण | सदस्य |
| ७. | प्रधान सचिव, कृषी | सदस्य |
| ८. | प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण | सदस्य |
| ९. | प्रधान सचिव, शालेय शिक्षण | सदस्य |
| १०. | प्रधान सचिव, नगर विकास-२ | सदस्य |
| ११. | प्रधान सचिव, पर्यावरण | सदस्य |
| १२. | प्रधान सचिव, उद्योग | सदस्य |
| १३. | प्रधान सचिव, पशु संवर्धन | सदस्य |
| १४. | प्रधान सचिव, मत्स्य व्यवसाय | सदस्य |
| १५. | प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता | सदस्य |
| १६. | महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय | सदस्य |
| १७. | अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ, नागपूर | सदस्य |
| १८. | प्रधान मुख्य वन संरक्षक (प्रशिक्षण) पुणे | सदस्य |
| १९. | सचिव, सांस्कृतिक कार्य | सदस्य |
| २०. | महासंचालक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी) | सदस्य |
| **अशासकीय सदस्य** | | |
| २१. | डॉ. राजेंद्र सिंग | विशेष निमंत्रित |
| २२. | डॉ. श्री. सुमंत पांडे | सदस्य |
| २३. | श्री. नरेंद्र चौघ | सदस्य |
| २४. | श्री. जयाजी पाईकराव | सदस्य |
| २५. | श्री. रमाकांत कुलकर्णी | सदस्य |
| २६. | डॉ. गुरुदास नुलकर | सदस्य |
| २७. | श्री. अनिकेत लौयीया | सदस्य |
| २८. | श्री. राजेश पंडित | सदस्य |
| २९. | श्री. महेंद्र महाजन | सदस्य |
| ३०. | संचालक, सांस्कृतिक कार्य | सदस्य सचिव |

२. समितीचा कार्यकाळ :-

सदर समिती अस्तित्वात आल्यापासून एक वर्ष अथवा शासनाचे पुढील आदेश होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत कार्यरत राहील.

३. समितीचे ध्येय आणि उद्दिष्ट :-

१. महाराष्ट्राला वारंवार भेडसावणाऱ्या पूर आणि दुष्काळ या समस्यांपासून मुक्तीसाठी नदी संवाद अभियानाचे आयोजन करणे.
२. अभियानांतर्गत जनसामान्यांना नदीसाक्षर करण्याबाबत उपाययोजना आखणे व अंमलबजावणीसाठी यंत्रणा निश्चित करणे.



Scanned by CamScanner

३. अमृत वाहिनी बनविण्यासाठी मसुदा तयार करणे.

४. नदीचे स्वास्थ्य आणि मानवी आरोग्य याबाबत प्रचार व प्रसार रुपरेषा आखणे.

५. नदीचा तट, प्रवाह जैवविविधतेबाबत प्रत्येक जिल्हयात प्रचार, प्रसार याबाबत नियोजन करणे.

६. नदीच्या पाणलोट क्षेत्राचा अभ्यास करुन त्यावर संबंधितांना कार्यवाहीबाबत अहवाल सादर करणे.

७. पावसाचे पाणी योग्य जागी अडवून भूजल स्तर उंचावणे, जनजागृती करण्याबाबत आकृतिबंध तयार करणे.

८. अतिक्रमण, शोषण आणि प्रदुषण या तीन प्रमुख कारणांचा अभ्यास आणि त्याचा नदी आणि मानवी जीवनावर होणारा परिणाम अभ्यासणे व त्याचा प्रचार व प्रसार करणेबाबत आखणी करणे.

९. महाराष्ट्रातील सुमारे ७५ नदी खोऱ्यांतून नदी संवाद यात्रा आयोजित करण्याबाबत आराखडा तयार करुन अंमलबजावणी करणे.

१०. शासन, समाज आणि नदीवर काम करणाऱ्या संस्थांमध्ये सुसुत्रता आणणेसाठी प्रयत्न करणे.

११. स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायत, नगरपंचायत, नगरपालिका आणि महानगरपालिका) यांचे जलव्यवस्थापन अभ्यासणे, त्यातील उणीवा आणि उत्कृष्ट उदाहरणे अभ्यासणे, त्यांचे निराकरण करण्यास लोकसंवाद घडविणे.

१२. नदी, समाज आणि शासन यांच्यात सुसंवाद प्रस्थापित करणे.

४. समितीमधील अशासकीय सन्माननीय सदस्यांना वित्त विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार बैठक भत्ता अनुज्ञेय राहील. सदर देयके "स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव" अंतर्गत निर्माण करण्यात आलेल्या लेखाशीर्ष मागणी क्र. झेडडी-२, मुख्य लेखाशीर्ष २२०५ कला व संस्कृती, (१०२) कला व संस्कृती, (१३) स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव, (१३) (०१) स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवांतर्गत कार्यक्रम, (२२०५ ३७३३) ५० इतर खर्च (कार्यक्रम) या अंतर्गत मंजूर तरतूदीतून करण्यात येईल.

(विलास रा. थोरात)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,मलबार हिल, राजभवन, मुंबई
२. मा. अध्यक्ष/मा. उपाध्यक्ष, विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
३. मा. सभापती/मा. उप सभापती, विधान परिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई यांचे खाजगी सचिव
४. मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई



Scanned by CamScanner

५. मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
७. सर्व मा. मंत्री यांचे खाजगी सचिव
८. मा. विरोधी पक्षनेता विधानसभा / विधान परिषद यांचे खाजगी सचिव
९. सर्व मा. सदस्य, विधानसभा / विधान परिषद
१०. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
११. सर्व संबंधित शासकीय सदस्य, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१२. सर्व मान्यवर अशासकीय समिती सदस्य (सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत)
१३. सचिव (सां.का.) यांचे स्वीय सहाय्यक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
१४. उप सचिव ( सां.का.) यांचे स्वीय सहाय्यक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२
१५. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, जुने सचिवालय इमारत, एम.जी. रोड, मुंबई ३२
१६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई
१७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१८. कार्यासन अधिकारी, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग (अर्थसंकल्प शाखा)
१९. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
२०. महालेखापाल (लेखा परीक्षा) - १ महाराष्ट्र, मुंबई
२१. महालेखापाल (लेखा परीक्षा) - २ महाराष्ट्र, नागपूर
२२. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता) - १ महाराष्ट्र, मुंबई
२३. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)- २ महाराष्ट्र, नागपूर
२४. निवड नस्ती, सां.का.४

Scanned by CamScanner